तात्काळ परिस्थितीत खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय उपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती

सुधारित वेतनाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे सुधारित प्रमाण ...........

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. एमएजी/१०८९/६०८/आरोग्य -९
मंत्रालय मुंबई- ४०००३२.
दिनांक १२ ऑक्टोबर १९८९

वाचा : शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी १०८१/४९०७/आर-९ दिनांक १९.१०.१९८३

शासन निर्णय: दिनांक १.१.१९८६ पासून शासकीय कर्मचा-यांसाठी सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-१०८१/४९०७/आरोग्य-९ दिनांक १९/१०/१९८३ मधील परिच्छेद २ व परिच्छेद ३ खालील प्रमाणे सुधारण्यात येत आहेत.

परिच्छेद २ : शासकीय कर्मचा-यास किंवा त्याच्या कुटुंबियास खाजगी रुग्णालयामध्ये आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या उपचारांसाठी केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती खाली दिलेल्या विवरणपत्राच्या स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या वेतनटप्प्याच्या संदर्भात आणि स्तंभ ३ मध्ये नमूद केलेल्या दरानुसार विनियमित करण्यात यावी.

| अ.क्र. | मासिक मूळ वेतन | प्रतिपूर्ती करावयाची रक्कम |
|---|---|---|
| १. | रुपये २००० पर्यन्त | प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% |
| २. | रुपये २८०१ ते रु. ३,५०० पर्यन्त | प्रत्यक्ष खर्चाच्या ८५ % |
| ३. | रुपये ३,५०१ व त्यापेक्षा जास्त. | प्रत्यक्ष खर्चाच्या ८० % |

वरील कोष्टकानुसार अनुज्ञेय ठरणारी प्रतिपूर्तीची रक्कम प्रत्येक प्रकरणी रुपये १०,०००/- च्या कमाल मर्यादेपर्यन्तच असेल.

परिच्छेद ३ : खाजगी रुग्णालयातील रहाण्याच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची अनुज्ञेयता ठरविताना अशी अट असेल की [एकूण खर्चात अंतर्भूत असलेल्या] रुग्णालयात रहाण्यासाठीच्या खर्चाच्या १० %, १५ %, २० % [यथोचित वेतन गटाप्रमाणे] इतकी रक्कम शासकीय कर्मचारी शासकीय रुग्णालयातील अनुज्ञेय नर्सिंगहोम मध्ये दाखल झाला असता त्यास द्याव्या लागणा-या आकाराच्या ५० % इतक्या रकमेपेक्षा कमी असू नये . व ही रक्कम कमी असल्यास रुग्णालयात रहाण्यासाठीच्या प्रत्यक्ष खर्चातून शासकीय रुग्णालयात अनुज्ञेय सुश्रुषा कक्षासाठी द्यावी लागणारी ५० % आकाराची रक्कम वजा करून, उरलेल्या संपूर्ण रकमेची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

.....२....

शासकीय कर्मचा-याना त्यांच्या वेतनाप्रमाणे शासकीय रुग्णालयात अनुज्ञेय असलेले नर्सिंग होम व त्यासठी आकारले जाणारे दर खालीलप्रमाणे असावेत,

| अ. क्र. | मूळ मासिक वेतन | अनुज्ञेय नर्सिंग होम | ग्रामीण भागातील प्रत्येक दिवसाचे दर | नागरी भागातील प्रत्येक दिवसाचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | रु. ११०० पर्यन्त | जनरल वॉर्ड | रु. १५=०० | रु. २०=०० |
| २. | रु. ११०१ ते १५०० | जनरल वॉर्डच्या बाजूच्या बाथरुम नसलेला कक्ष | रु. २०=०० | रु. ३०=०० |
| ३. | रु. १५०१ ते २८०० | बाथरुमसहित डबल बेड | रु. ३०=०० | रु. ४०=०० |
| ४. | रु. २८०१ ते ३५०० | बाथरुमसह एक कक्ष | रु. [illegible]०=०० | रु. ८०=०० |
| ५. | रु. ३५०१ ते व त्या पेक्षा जास्त | बाथरुमसह वातानुकुलीत एक कक्ष | रु. ८०=०० | रु. १२०=०० |

२. ई. एखादा शासकीय कर्मचारी खाजगी रुग्णालयात त्याला अनुज्ञेय असलेल्या उपरोक्त नर्सिंगहोम पेक्षाउच्च स्वरुपाच्या नर्सिंग होममध्ये दाखल झाला तर त्यासाठी भरावी लागणारी जादा रक्कम शासकीय कर्मचा-यांस स्वत: सोसावी लागेल.

३. हे आदेश ते निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. दिनांक १.१.१९८६ ते दि. ११.१०.१९८९ या कालावधीतील प्रकरणे असुधारित वेतनश्रेणी विचारात घेवून नियमित करण्यात यावीत.

४. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी १०८१/४९०७/ पीएच-९, दिनांक १९.१०.१९८३ मधील इतर आदेश त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांसहीत तसेच जारी राहातील.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२६/८९ सेवा-५ दिनांक ७.१०.१९८९ नुसार मिळालेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/- [र.शं. पिसे]
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव.

क्र. लेखा/६/वै.खा.प्रतिपूर्ती/वशी-७९०
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी, २०.११.१९८९

प्रतिलिपी:- १)तहसीलदार सर्व